# केज-बीड मार्गावरील अपघातात दोघांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** मुलीच्या लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी अहिल्यानगरकडे जात असताना प्रवासी वाहन व ट्रकमध्ये शुक्रवारी सकाळी सांगवी बीड-केज मार्गावरील पुलाजवळ झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. मृतांपैकी एक नियोजित वधूचा पिता तर महिला ही नवरदेवाची मावशी असून, दोघेही शिक्षक होते, अशी माहिती समोर आली.

जखमींमध्ये नवरीचे चुलते, एक भाऊ व अन्य दोघांचा समावेश आहे. उर्मिला तथा उमा श्रीराम घुले, असे मृत महिलेचे नाव असल्याची माहिती केजचे निरीक्षक वैभव पाटील यांनी दिली. तर रामेश्वर डोईफोडे यांचा मृत्यू अंबाजोगाई येथील रुग्णालयात उपचार घेत असताना झाला. कासारी येथील रहिवासी असलेले रामेश्वर यांच्या मुलीचा २३ फेब्रुवारी रोजी लग्न नियोजित होते.

# ठाकरे गटाची गळती थांबेना

## संभाजीनगरमधील १० माजी नगरसेवक शिंदे गटात

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या नेतृत्वाखाली मध्य मतदारसंघातील १० माजी नगरसेवकांनी शुक्रवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्त्व स्वीकारले.

अलीकडेच माजी महापौर नंदकुमार घोडले यांचाही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश झाला होता. प्रवेश घेऊ इच्छिणारे नगरसेवक सकाळीच मुंबईच्या दिशेने रवाना झाले. या मतदारसंघात माजी खासदार चंद्रकांत खैरे यांचे पुतणे सचिन आणि त्यांचा मुलगा ऋषी खैरे वगळता अन्य सर्व नगरसेवकांना आपल्या बाजूने वळविण्यात आमदार जैस्वाल यांना यश मिळाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी शहरातील प्रत्येक वार्डात बैठका घेण्याचा सपाटा लावला होता. त्याला उत्तर म्हणून ठाकरे गटातून माजी नगरसेवकांना शिवसेना (एकनाथ शिंदे) गटात ओढून घेतले जात आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीपूर्वी जिथे खैरे तिथे नंदकुमार घोडले असे चित्र होते. मात्र, घोडले यांनी ठाकरे गटाला सोडले. त्यानंतर माजी नगरसेवकांमधील मोठा गट शिवसेनेत जाईल, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. शुक्रवारी दहा जणांनी एकनाथ शिंदे यांचे नेतृत्त्व स्वीकारले. यामध्ये महापालिकेचे माजी सभापती मोघन मेघावाले, माजी सभागृह नेता किशोर नागरे, गटनेते मकरंद कुलकर्णी, अनिल जयस्वाल, रुपचंद व्यवहारे, स्वाती नागरे, ज्योती वाघमारे, मीना गायके, ज्योती पिंजरकर, सीमा खरात यांचा समावेश आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील प्रभावी कार्यकर्त्यांना शिवसेना एकनाथ शिंदे पक्षात घेण्यावर जोर दिला जात आहे. महापालिका निवडणुकीमध्ये भाजप-शिवसेना अशी युती होणार की स्वबळावर हे दोन पक्ष निवडणुका लढविणार याचे निर्णय होणे बाकी आहे. मात्र, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात येणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रवेश देण्याचा सपाटा शिवसेना-भाजपने सुरू केला आहे.

शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षातील कार्यकर्त्यांनी अलीकडेच एका मेळाव्यात शिवसेना नेते चंद्रकांत खैरे आणि विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांना जाहीरपणे सुनावले होते. आपसातील वाद कमी करा तरच लढता येईल, असे सांगितले होते. या कार्यक्रमात अक्षरशः हात जोडून आता उद्धव ठाकरे यांना सोडून जाऊ नका, असे आवाहन चंद्रकांत खैरे यांना करावे लागले होते. त्यानंतरही गळती थांबता थांबेना, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

या अनुषंगाने शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांना विचारले असता 'जे गेले त्यांच्या विरोधातील अनेक कार्यकर्ते पर्याय म्हणून उभे आहेत. त्यामुळे स्थिती बिघडली आहे असे नाही. शिवसेना जेव्हा स्थापन केली होती तेव्हा आमच्याबरोबर जेवढे होते तिथपासून पुन्हा काम करण्याची तयारी आहे. त्यासाठी बैठका घेणे सुरू केले आहे,' असे ते म्हणाले.

**Home First Finance Company India Limited**
CIN: L65990MH2010PLC240703
Website: homefirstindia.com
Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com

## ताबा सूचना

**संदर्भ : सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८च्या सब-रुल (१) अंतर्गत ताबा सूचना**

ज्याअर्थी, होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी संबंधित सूचनांच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत थकीत देणींच्या प्रदानाकरिता खालील नमूद केलेल्या तुमच्या नावे/ ऋणकोंवर फर्माविणाऱ्या सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२चा ॲक्ट नं. ५४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली दिल्यानुसार त्यांच्या संबंधित तारखांदिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे. तुम्ही/ सर्व ऋणको, तथापि, विनिर्दिष्ट वेळेत उक्त थकीत देणींचे प्रदान करण्यास असमर्थ ठरला आहात, म्हणून **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड**ने सरफेसी ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (४)च्या आणि त्याखालील वाचलेल्या रुल्सच्या तरतुदीअंतर्गत याखाली नमूद केल्यानुसार सुरक्षित मत्तेचा **ताबा** घेतला आहे.

| अ. क्र. | ऋणको/ सह-ऋणको/ हमीदारांची नावे | गहाणवट मालमत्तेचे वर्णन | मागणी सूचनेची तारीख | मागणी सूचनेच्या तारखेनुसार एकूण थकीत रक्कम (आयएनआरमध्ये) | ताब्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| 1. | भगवान दौलत चौधरी, उमेश भगवान चौधरी, दिगंबर भगवान चौधरी, अलका भगवान चौधरी | प्लॉट नं. ६५, ब्लॉक नं. १, गॅट नं. ३८६ (पश्चिमेकडील पार्ट) व येथे स्थित- कुसुंबे खुर्द, ता. व जि. जळगाव-४२५ ००१, महाराष्ट्र. | 06-Dec-22 | 1,004,069 | 05-Feb-25 |

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत. ऋणको/ हमीदार तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी वर नमूद केलेल्या तारखेदिवशी उक्त रुलच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला/ तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

**ऋणको/ हमीदार** तसेच **आम जनतेस** याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी वरील संदर्भित मालमत्ता/ सुरक्षित मत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागासंबंधित व्यवहार करू नये आणि उक्त मालमत्ता/ सुरक्षित मत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार मालमत्ता/ सुरक्षित मत्तेनुसार यावरील नमूद केलेल्या रकमेकरिता **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड**च्या आकाराच्या विषयाधीन असेल, जी **रक्कम पूर्णतः प्रदान होईपर्यंत त्यावरील पुढील व्याजासह देय आहे.**

**सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.**

स्थळ : जळगाव
तारीख : ०८.०२.२०२५

प्राधिकृत अधिकारी,
होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

# बारावीच्या परीक्षा केंद्रांतील प्रत्येक खोलीमध्ये सीसीटीव्ही

## कॉपीमुक्तीसाठी लातूर जिल्ह्यात पहिल्यांदा प्रयोग

**प्रदीप नणंदकर, लोकसत्ता**

**लातूर :** राज्यात पहिल्यांदाच लातूर जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेच्या वेळी सर्व परीक्षा केंद्रांवरील सर्व खोल्यांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिला आहे.

'लातूर जिल्ह्यात कॉपीमुक्तीची कसोटी' या मथळ्याखाली लोकसत्तामध्ये ६ फेब्रुवारीच्या अंकात वृत्त प्रकाशित झाल्यानंतर प्रशासनाने त्याची दखल घेऊन विविध निर्णय घेतले. परीक्षा सुरू झाल्यापासून ती संपेपर्यंत सीसीटीव्हीचा सर्व तपशील पेन ड्राइव्हमध्ये गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करावा, अशा सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

कॉपीमुक्तीसाठी प्रत्येक केंद्रावर बैठे पथक तैनात करण्यात येणार आहे. ज्या परीक्षा केंद्रांवर पूर्वी गैरप्रकार घडले त्या केंद्रांवर तर नजर ठेवली जाणार आहे; मात्र, ज्या केंद्रांमध्ये गैरप्रकार घडले नाहीत अशा केंद्रांवरही अचानक तपासणी केली जाणार आहे. अशा केंद्रांवर गैरप्रकार आढळल्यास ते केंद्र कायमचे बंद केले जाईल, असे जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

बारावीच्या परीक्षा सीसीटीव्हीच्या नजरेखाली घेण्याचा हा प्रयोग राज्यात पहिल्यांदाच होत असल्याने परीक्षेत नवे लातूर प्रारूप तयार होईल, असे सांगण्यात येत आहे.

**Home First Finance Company India Limited**
CIN: L65990MH2010PLC240703,
Website: homefirstindia.com Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com

परिशिष्ट - IV- ए [रुल ८(६)च्या तरतुदी पाहा]

## स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

आम जनतेस आणि रकाना (ii)नुसार विशेषकरून ऋणको व सह-ऋणको यांना याद्वारा सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोंकडे गहाण ठेवलेली/ ताब्यात असलेली रकाना (iii)नुसार खाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा याखाली सविस्तररीत्या दिलेली तिची देणी अधिक व्याजाच्या वसुलीकरिता होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारींनी घेतला आहे आणि ज्याअर्थी, परिणामी देणींची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यामुळे निम्नस्वाक्षरीकारांनी उक्त मालमत्तेच्या विक्रीद्वारा देणींच्या वसुलीबाबत उक्त ॲक्टच्या प्रस्तावानुसार सेक्शन १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त मालमत्तेची विक्री याखाली वर्णिल्यानुसार ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'', आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर करण्यात येणार आहे. लिलावाचे आयोजन होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेडची देणी असलेल्या, रकाना (i)नुसार ऋणको व सह-ऋणकोकडील देय रकमेच्या वसुलीकरिता ''ऑनलाइन'' करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | ऋणको व सह-ऋणकोचे नाव | मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचनेची तारीख | मागणी सूचना रक्कम | ताब्याची तारीख | मार्केट मूल्य | इरठे रक्कम | लिलावाची तारीख व वेळ | इरठे व कागदपत्रांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ | प्राधिकृत अधिकारींचा नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | ज्ञानेश्वर सुरेश मोजड, प्रियांका ज्ञानेश्वर मोजड, उदय माधवराव पाटील | फ्लॅट नं. एफ-२ (पहिला मजला), गजानन संकुल, सर्व्हे नं. ११४/पी, सिडको वाळूज महानगर-२, प्लॉट नं. ९१, गट नं. ११४, सिडको महानगर २, ग्रोथ सेन्टर-१, औरंगाबाद, महाराष्ट्र, पिनकोड-४३१ ००१. | 03-Oct-23 | 1,315,325 | 14-Sept-24 | 1,490,000 | 149,000 | 24.02.2025 (11am-2pm) | 22.02.2025 (upto 5 pm) | 8329728927 |
| 2. | शुभम परे, अशोक परे, मुन्नीबाई परे | रो हाऊस-६०, गॅट नं. ६०, श्री कृष्ण रुक्मिणी रेसिडेन्सीपैकी, प्लॉट नं. ६०, चौधरी नगर, खारपुडी रोड, पोदार स्कूलच्या मागे, जालना-२३१ २०३. | 05-Jan-23 | 1,188,406 | 24-Sept-24 | 1,390,000 | 139,000 | 24.02.2025 (11am-2pm) | 22.02.2025 (upto 5 pm) | 8329728927 |

| ई-लिलाव सेवा पुरवठाकार | ई-लिलाव वेबसाइट/ तपशील, अन्य शर्ती व अटींकरिता | अका. नं. : इरठे/ अन्य रक्कम भरण्याकरिता | शाखा आयएफएससी कोड | लाभाधिकारीचे नाव |
|---|---|---|---|---|
| **कंपनीचे नाव** : ई-प्रोक्युअरमेन्ट टेक्नोलॉजीस लि. (ऑक्शन टायगर)<br>हेल्प लाइन नं. : ०७९-३५०२२१६० / १४९ / १८२<br>संपर्क व्यक्ती : राम शर्मा - ८०००२३२९७<br>ई-मेल आयडी : ramprasad@auctiontiger.net व support@auctiontiger.net | http://www.homefirstindia.com<br>https://homefirst.auctiontiger.net | ९१२०२००३६२६८११७ - होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड - ॲक्सिस बँक लि., एमआयडीसी, अंधेरी (पूर्व). | UTIB0000395 | प्राधिकृत अधिकारी, होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड |

**बोलीवृद्धी रक्कम : रु. १०,०००/-.** विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारा (https://homefirst.auctiontiger.net) या वेब पोर्टलवर तरतूद केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत करण्यात येणार आहे. ऑनलाइन ई-लिलाव बोली प्रपत्रे, प्रतिज्ञापत्र, ऑनलाइन ई-लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण शर्ती व अटी समाविष्ट ई-लिलाव निविदा कागदपत्रे पोर्टल साइटवर उपलब्ध आहेत. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहिती व उत्तम ज्ञानानुसार मालमत्तेवर तेथे कोणताही भार नाही. तथापि, स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेस बाधक ठरणारे दावे/ हक्क/ देणी आणि लिलावावरील मालमत्तेचा नामाधिकार, भार इ.संबंधित चौकशी त्यांनी स्वतः स्वतंत्ररीत्या करावी. या ई-लिलाव जाहिरातीत होम फर्स्टचे कोणतेही प्रतिनिधित्व किंवा कोणतीही बांधिलकी नाही आणि तसे सिद्ध होत नाही. मालमत्तेची विक्री होम फर्स्टला ज्ञात असलेल्या किंवा ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान आणि भावी भारांसह करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/ हक्क/ देणी यांकरिता कोणत्याही तऱ्हेने जबाबदार असणार नाहीत. विक्री सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत विहित नियम/ शर्तींच्या विषयाधीन असणार आहे. **कोणतीही विसंगती आढळल्यास सूचनेची इंग्लिश आवृत्ती ग्राह्य धरण्यात येईल.**

**सरफेसी ॲक्ट, २००२ अंतर्गत सांविधिक १५ दिवसीय विक्री सूचना**

ऋणको/ हमीदारांना याद्वारा अधिसूचित करण्यात येते की, त्यांनी ई-लिलावाच्या तारखेपूर्वी आत्तापर्यंतचे व्याज व सहाय्यभूत खर्चासह मागणी सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार रकमेचे प्रदान करावे, त्यास असमर्थ ठरल्यास मालमत्तेचा लिलाव करण्यात येईल/ विक्री करण्यात येईल आणि उर्वरित रक्कम, जर असल्यास, व्याज व किमतीसह वसूल करण्यात येईल.

दिनांक : ०८.०२.२०२५, स्थळ : औरंगाबाद, जालना

द्वारा स्वाक्षरीकृत/- प्राधिकृत अधिकारी, होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

# आमदार नमिता मुंदडा यांच्या निवडीला आव्हान

## याचिकेत मतदान यंत्रावर आक्षेप

**छत्रपती संभाजीनगर :** बीड जिल्ह्यातील केज या राखीव विधानसभा मतदारसंघाच्या भाजपच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या निवडीला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. या निवडणूक याचिकेत मतदान यंत्रावर संशय व्यक्त करण्यात आला आहे. मुंदडा यांच्यासह सर्व उमेदवार व निवडणूक आयोग यांना नोटीस बजावण्याचा आदेश न्या. अरुण पेडणेकर यांनी दिले आहेत.

नमिता मुंदडा या केज मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर विजयी झाल्या आहेत. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी निवडणूक लढवली होती. निवडणुकीत पराभव झाल्यानंतर उमेदवार पृथ्वीराज शिवाजी साठे यांनी खंडपीठात निवडणूक याचिका दाखल केली. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी मागणी करून देखील 'अर्ज १७ सी' ची प्रत त्यांना दिली नाही. त्याचप्रमाणे निवडणूक प्रक्रियेची केलेली छायाचित्रफीत, सीसीटीव्ही फुटेज यांची मागणी करून दिले नाही. निवडणूक अधिकाऱ्यांनी विजयी उमेदवाराला झुकते माप दिले आहे. केज विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक आयोगाने कुठलेही नोटिफिकेशन काढले नाही, असा आरोप याचिकेत केला आहे.

सुनावणीनंतर आमदार नमिता मुंदडा यांच्यासह २३ उमेदवार, निवडणूक आयोग यांना नोटीस बजावण्याचे आदेश खंडपीठाने दिले आहेत. पुढील सुनावणी २४ फेब्रुवारी रोजी ठेवली आहे. अर्जदारांतर्फे ॲड. रवींद्र गोरे, ॲड. सुस्मिता दौंड काम पहात आहेत.

**उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक**

**नोंदणीकृत कार्यालय :** ग्रेप गार्डन, नं. २७, ३रा 'ए' क्रॉस, १८वा मुख्य, ६वा ब्लॉक, कोरमंगला, बेंगळूरु-५६० ०९५, कर्नाटक.
**प्रादेशिक कार्यालय ;** ७वा मजला, अल्मोन्टे आयटी पार्क, अ. क्र. ८, खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे-४११ ०१४.

## सार्वजनिक लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ९ आणि नियम ८(६)च्या तरतुदी सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत विक्रीसाठी सार्वजनिक सूचना.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.चे अधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकाराने सरफेसी कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित केले जाते की, खाली नमूद केलेल्या खात्यामध्ये गहाण मालमत्तेचा बँकेच्या थकबाकीची वसुली ''जसे आहे जिथे आहे आधारावर'' आणि ''जसे आहे जे आहे आधारावर'' येथे खाली नमूद केलेल्या तारखेला सार्वजनिक लिलाव करण्यात येईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. / शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाण ठेवणाऱ्याचे नाव | रोजीनुसार १३(२) नोटीस तारीख/ थकबाकी देय (रु.मध्ये) | ताब्याची तारीख | आरक्षित किंमत भारतीय रु.मध्ये/ ईएमडी भारतीय रु.मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ४४७४२१०१३००००००९४ / ४४७४-जळगाव | **१) श्री. नामदेव मोतिराम बुंधे, २) श्री. कमलाबाई नामदेव बुंधे,** दोघेही येथे राहतात- घर क्र. २१३-२१४, अस्वर वाडा, पोस्ट शिरसोली, ता. जि. जळगाव-४२५ ००२. | 11.10.2021 / Rs. 9,78,494.00 as on 27.09.2021 | 10.09.2024 | Rs. 9,23,000/- / Rs. 92,300/- |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** नॉर्थ साइड ब्लॉकमध्ये असलेली डुप्लेक्स हाऊस प्रॉपर्टी, उत्तर बाजूच्या भागातून मोजमापे ५६.४४ चौ.मी., प्लॉट क्र. १० पैकी १००.०९ चौ.मी., १५५.८३ चौ.मी., गट क्र. ३९४/१ असलेली, शिरसोली, प्रा. बो., ता. आणि जिल्हा जळगाव येथे स्थितचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि खालीलप्रमाणे सीमाबद्ध : पूर्वेकडे किंवा दिशेने : गट क्र. ३९१, दक्षिणेकडे किंवा दिशेने : प्लॉट क्र. १०चा ब्लॉक, पश्चिमेकडे किंवा दिशेने : वापर आणि रस्ता. | | | | |
| 2 | ४४७४२१०१७००००००१३ / ४४७४-जळगाव | **१) मनोज भास्कर पाटील, २) वैशाली मनोज पाटील,** दोघेही येथे राहतात- सीटीएस क्रमांक ३४६, ए/पी- नांद्रे बुद्रुक, पाटील वाडा, महादेव मंदिराजवळ, जळगाव-४२५ ००१. | 08.09.2021 / Rs. 7,64,955.00 as on 11.08.2021 | 12.09.2024 | Rs. 7,71,000/- / Rs. 77,100/- |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** सीटीएस क्र. ३४६ असलेली मालमत्ता, मोजमापे क्षेत्रफळ ५१.४ चौ.मी., जीपीएच क्र. १७४ असलेले, नांद्रे बुद्रुक, तालुका व जिल्हा- जळगाव येथे स्थितचे ते सर्व तुकडे आणि पार्सल. | | | | |
| 3 | ४४५५२१०१३००००००६८ / ४४५५-समर्थ नगर | **१) नितीन कचरु जाधव, २) कचरु भावराव जाधव, ३) प्रियांका नितीन जाधव,** सर्व येथे राहतात- संघर्ष नगर, येथे आणि पोस्ट घाणेगाव, तालुका गंगापूर, जि. औरंगाबाद-४३१ १३६. ***१) येथेदेखील:*** राहणार- रो हाऊस क्र. १५, कामधेनू रेसिडेन्सी, नारायण खुर्द, ता. गंगापूर, औरंगाबाद. | 04.11.2022 / Rs. 7,76,427.03 as on 20.09.2022 | 27.09.2024 | Rs. 6,26,000/- / Rs. 62,600/- |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** रो हाऊस क्र. १५, मोजमापे क्षेत्रफळ ४१७ चौ.फू. म्हणजे ३८.७६ चौ.मी., कामधेनू रेसिडेन्सीमध्ये ग्रामपंचायत ळिकत क्र. पी १४१/६८ आणि मिळकत क्र. पी १४१/६९ नारायण खुर्द ता. येथे स्थित. गंगापूर, जिल्हा औरंगाबाद, जे ०९.०९.२०१९च्या विक्री करारानुसार तुमच्या मालकीचे होते याचे ते सर्व तुकडे आणि पार्सल. | | | | |

**मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ : दि. १५.०२.२०२५ आणि २०.०२.२०२५ सकाळी ११.०० वा. ते दुपारी ०४.०० वा.दरम्यान**
**बोली आणि ईएमडी सादर करण्याची तारीख : दि. २५.०२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ते संध्याकाळी ०५.०० वा.दरम्यान**
**लिलावाची तारीख आणि वेळ : दि. २७.०२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी ०२.०० वा.पर्यंत**

**इसारा ठेव अनामत (ईएमडी) भारतीय रुपयांत (''उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड''च्या नावे देय डिमाण्ड ड्राफ्टद्वारेच भरले पाहिजेत)**

**बोली आणि लिलाव सादर करण्याचे ठिकाण : १)** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि., निरंजन कॉम्प्लेक्स, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेसमोर, रिंग रोड, जळगाव, महाराष्ट्र-४२५ ००१- अ.क्र. १ आणि २. (दीपक मंत्री- ९५६११५७७५७, धिरज रांगडे- ९५१८५५४६८८). **२)** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, श्री व्हिला, पोलीस वर्कशॉपसमोर, निराला बाजार रोड, समर्थ नगर, औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र-४३१ ००१- अ.क्र. ३ आणि ४ (संपर्क : कृष्णा सिंग- ७७६७८४७५८४, अर्जुन शेरकर- ८४८२८३८३८६).

**नियम आणि अटी :** ई-लिलाव ''जसे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जे काही आहे ते'' आधारावर आयोजित केले जात आहे.

१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या उत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, कोणत्याही मालमत्तेवर कोणताही बोजा नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी, मालमत्तेचे भार, मालमत्तेचे टायटल/ लिलावात ठेवलेले दावे/ हक्क/ देय/ मालमत्तेवर परिणाम होण्याबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात कोणत्याही वचनबद्धतेची किंवा बँकेच्या कोणत्याही प्रतिनिधित्वाची स्थापना करीत नाही आणि मानली जाणार नाही. ही मालमत्ता बँकेला ज्ञात असो वा अज्ञात असो, सध्याच्या आणि भविष्यातील सर्व भारांसह विकली जात आहे. अधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यांसाठी/ अधिकार/ देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.
२. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्ता आणि तपशिलाची तपासणी करणे आणि त्यांचे समाधान करणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल. लिलावात ठेवलेल्या मालमत्तेची तपासणी करण्यास इच्छुक बोलीदारांना प्रत्येक मालमत्तेच्या वर्णनासमोर नमूद केल्याप्रमाणे परवानगी दिली जाईल.
३. इच्छुक बोलीदारांनी वर नमूद केल्याप्रमाणे लिलावाच्या तारखेच्या एक दिवस अगोदर निम्नस्वाक्षरीकार अधिकृत अधिकाऱ्यासमोर त्यांची बोली सादर करावी.
४. ई-लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेद्वारे मंजूर ई-लिलाव सेवा प्रदाता- मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि. यांच्याद्वारे केला जाईल. संपर्क व्यक्ती- प्रभाकरन एम.- (मोबा. क्र. ७४१८२८१७०९). इच्छुक बोलीदारांना वेबसाइटवरील मालमत्तांच्या तपशिलासाठी **https://www.bankeauctions.com** किंवा **https://www.ujjivansfb.in/e-auctions** ला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि बोलीमध्ये भाग घेण्यासाठी त्यांनी **https://www.bankeauctions.com** या पोर्टलवर त्यांची नावे नोंदवावीत आणि त्यांचा वापरकर्ता-आयडी आणि पासवर्ड विनामूल्य मिळवावा. संभाव्य बोलीदार सेवा प्रदाता मे. सी१ इंडिया प्रा. लि., हेल्पलाइन क्र.- ७२९१९१८८२४, २५, २६, सपोर्ट ई-मेल आयडी: support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल- **https://www.bankeauctions.com** यांच्याकडून ई-लिलावावर ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात.
५. सुरक्षित धनको, म्हणजे, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.ने बोली स्वीकारल्याच्या विषयाधीन राहून, सर्वोच्च बोली लावणाऱ्या/ देऊ केलेल्यांना मालमत्ता विकली जाईल. तथापि, आवश्यक वाटल्यास आंतर-से-बिडिंगला परवानगी देण्याचा निम्नस्वाक्षरीकारांना पूर्ण अधिकार आहे. कोणतेही कारण न देता कोणतीही ऑफर/ निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्याला आहे.
६. यशस्वी बोली लावणाऱ्याची बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) अंश विक्रीच्या मोबदल्यात ठेवली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची ईएमडी परत केली जाईल. बयाणा ठेवीवर कोणतेही व्याज असणार नाही. यशस्वी बोली लावणाऱ्याला विक्री किमतीच्या २५% रक्कम जमा करावी लागेल. आधीच भरलेले ईएमडी समायोजित करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याकडून बोलीची किंमत स्वीकारल्यापासून २४ तासांच्या आत आणि शिल्लक ७५% विक्री किंमत विक्रीच्या १५व्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा अशा वाढीव कालावधीत कोणत्याही परिस्थितीत ३ महिन्यांपेक्षा जास्त नसेल आणि अधिकृत अधिकाऱ्याच्या विवेकबुद्धीनुसार लिखित स्वरूपात सहमती दर्शविली जाईल तेव्हा भरावी लागेल. यशस्वी बोलीदाराने पैसे भरण्यात कसूर केल्यास, प्रस्तावाद्वारे आधीच जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल आणि मालमत्तेचा पुन्हा लिलाव केला जाईल आणि कसूर करणाऱ्या खरेदीदाराचा मालमत्तेवर/ रकमेवर कोणताही दावा/ हक्क नसेल.
७. प्रकाशन हे सक्तीच्या प्रमुख कलमाच्या विषयाधीन आहे.
८. शेवटच्या क्षणी बोली लावणे बोलीदारांच्या स्वतःच्या हितासाठी टाळले पाहिजे कारण उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा प्रदाता यांपैकी कोणतीही चूक/ बिघाड (इंटरनेट बिघाड/ पॉवर फेल इ.)साठी जबाबदार असणार नाही. अशा आकस्मिक परिस्थितीपासून बचाव करण्यासाठी बोलीदारांना विनंती केली जाते की, त्यांनी सर्व आवश्यक व्यवस्था/ पर्याय, जसे की वीजपुरवठा बॅक-अप इत्यादी करावयात, जेणेकरून ते अशा परिस्थितीपासून बचाव करू शकतील आणि लिलावात यशस्वीपणे सहभागी होऊ शकतील.

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी शेड्यूल केलेल्या सार्वजनिक लिलावाबद्दल वरील नामांकित कर्जदार/ जामीनदार/ तारणकर्ता यांना ही सूचना आहे.

ठिकाण : औरंगाबाद
दिनांक : ०६.०२.२०२५

सही/- प्राधिकृत अधिकारी,
उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक


लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

**VIDYAVARDHINI'S COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY**
K.T.Marg, Vasai Road (West), Pin-401202.
Tel: (0250) 233 82 34 (6 Lines), 7558351747, 7972019446,
E-mail: vcet_inbox@vcet.edu.in • Website: www.vcet.edu.in
Affiliated to Mumbai University, Approved by: AICTE, New Delhi. NBA & NAAC Accredited.

**FOR TEACHING POST**
Applications are invited for the posts of: **Professor, Associate Professor, Assistant Professor** in the Department of Computer Engg., Information Technology, Computer Science & Engineering (Data-Science), Artificial Intelligence & Data Science. Required qualifications are as per AICTE / University of Mumbai norms.

**FOR NON-TEACHING POST**
Applications are invited for: **Assistant Librarian, Library Clerk, Lab Assistant, Jr.Clerk.** Interested & eligible candidates should e-mail their resume to **hr@vcet.edu.in**, within **10 days** from the date of publication.
**-Secretary.**

**यात्रासहल**

दोस्तीटूर * अंदमान * नेपाळ- मुक्तिनाथ- जनकपूर * भुतान * कुरवपूर- पिठापुरम * नर्मदापरिक्रमा * शिमला- मनाली * उत्तरवाहिनीपरिक्रमा * सिक्कीम दार्जिलिंग * चारधामयात्रा * आसाम- पूर्वांचल- मेघालय. 8828224121/ 9702251584.
0070915287-13

**यात्रासहल**

महाकुंभ प्रयागराज रू.२९,९९९/- काशी, अयोध्या, द्वारका सोमनाथ, शिर्डी, स्टॅच्यु ऑफ युनिटी, लेह लधाक, काश्मीर, शिमला-मनाली, सिक्कीम, केरळ, राजस्थान उटी/ कुर्ग वायनाड, गोवा रू.६,९९९/- खंडेलवाल हॉलिडेज- 9136678205
0070948891-3

*प्रवासी टूर्स (मुंबई)* स्वस्त/मस्त किचन युनिटसह... *दार्जिलिंग- सिक्कीम गंगटोक- नामची- आसाम- चेरापुंजी- हावडा- कलकत्तासह... १२ मे (१३ दिवस.) २३५००/- *चारधाम- गंगोत्री- यमुनोत्री- उत्तरकाशी- केदारनाथ- बद्रीनाथ- हरिद्वार- ऋषीकेशसह... २७ जून (१३ दिवस.) २३५००/- *9322022096/ 9082588511.
0070949012-1

श्रीरामकृष्ण :- चारधाम- त्रियुगीनारायण- ०१-०५-२०२५// १२-०५-२०२५// २३-०५-२०२५// काश्मिर- वैष्णोदेवी- टुलिप गार्डन- ०२-०४-२०२५// १९-०४-२०२५// सिक्कीम- दार्जिलिंग- भुतान- १५-०४-२०२५// ०९-०५-२०२५ उत्तरवाहिनी नर्मदापरिक्रमा- ०१-०४-२०२५// १७-०४-२०२५/ लेह लडाख- २५-०४-२०२५// १५-०५-२०२५// अयोध्या- नेपाळ- जनकपूर- १८-०३-२०२५// १८-०४-२०२५// १६-०५-२०२५// नैनिताल- जिम कॉर्बेट पार्क- मुनसियारी- २४-०४-२०२५// कोकणातील आनंदवन बापट- ९१३७००१३९५/ ९८२००२३१०६.
0070945299-2

**मॅरेज ब्युरो**

सुप्रसिद्ध सौ. कुलकर्णी विवाहसंस्थेत नाव नोंदवा. सर्व जातींची उच्चशिक्षित स्थळे उपलब्ध. ४२ वर्षांची विश्वसनीय परंपरा, लाखो लग्न जुळविण्याचा अनुभव.
0070934850-8

**भविष्यविषयक**

**ॲस्ट्रॉलॉजी** : गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच/ वास्तुशास्त्राचे महत्त्व. वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातील स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वाटर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. 9820553276/ 9820612578. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070938551-1

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा